# कशी असावी शिक्षण प्रणाली ?

**भी.जो. शिंदे**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सारांश :**
माझ्या भारत मातेला स्वतंत्र होऊन साठ वर्षे होऊन गेली. जी स्वप्नं आपल्या देशातील विचारवंतांनी पाहिली ती पूर्ण फारशी झाली नाहीत. अनेक परकीय सत्तांनी आम्हाला गुलाम बनविलं होतं. या गुलामीतून देशभक्तांनी, भारतमातेच्या सुपुत्रांनी मुक्त केलं. वाटलं आता देशात आनंदी आनंद पाहायला मिळेल. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक, तात्त्वीक क्षेत्रात जो कचरा साचलाय, धूळ साचलीय ती साफ करता येईल. स्त्रीयांचं आणि पुरूषांचं जीवन उन्नत बनविता येईल, गरीबी दूर करता येईल, देशात कोठे भिकारी दिसणार नाही, बालकांचं जीवन पाहून गोकुळाची आठवण येईल नव्हे गोकुळच वाटेल, पण हे सर्व वाटणं व्यर्थ ठरलं, फोल ठरलं.

**प्रस्तावना :-**

परकीय लोकांच्या, साहेबांच्या पाणपोईचं फुकटचं पाणी पिणाऱ्या आम्हा बहुसंख्य भारतीयांच्यात कुठून येणार ज्ञान लालसा ? फुकटचं मिळत असेल तर रांगाच्या रांगा लागतात. कुठं गेली परिश्रमाशिवाय काहीही न घेण्याची वृत्ती ? कुठं गेली झोकून काम करण्याची वृत्ती ? कमीत कमी काम आणि जास्तित जास्त दाम असा रोग आज माझ्या बहुसंख्य भारतीयांना जडलाय. हे असं का झालं ? कोणती कोणती कारणं याच्या पाठीमाघे आहेत ? हे ोधताना, यावि ायी चिंतन करताना अनेक कारणं सांगता येतील. पण सर्व समस्यांच्या मूळाशी असलेलं अत्यंत महत्वाचं कारण म्हणजे आपली शिक्षण व्यवस्था आणि या शिक्षण व्यवस्थेचा कणा असलेला शिक्षक.

आपण ज्या शिक्षण व्यवस्थेच्या आधारे आपल्या विद्यार्थ्यांना घडवत आहोत ती शिक्षण व्यवस्था दुबळी आहे. जर ही व्यवस्था सक्षम असती तर आजची सर्व क्षेत्रातील अनागोंदी दिसली नसती. देशात चाललेला सर्वच क्षेत्रातला अप्रामाणिकपणा आणि सावळागोंधळ संपला असता. आपण देत असलेले शिक्षण वरकरणी खूप चांगले वाटत असले तरी ते पोकळ आहे, फुसका बार आहे. या शिक्षण व्यवस्थेत ताकत असती तर आमच्या देशातील सुसंस्कृतता निश्चितच वाढली असती. हीन, दीन, लाचार, अप्रामाणिक, भ्रष्टाचारी आणि स्वार्थी वृत्तीचा समाज बनला नसता. समाजात गुन्हेगारीला ऊत आला नसता. समाजात मानवतेचं अध:पतन झालं नसतं. समाजात आपापसातील प्रेमाला बेगडी रूप आलं नसतं. प्रेमाला ओहोटी लागली नसती. माणसाचा माणसावरील विश्वास वृध्दींगत होत गेला असता. पण असं काहीही घडताना दिसत नाही.

'आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार' हे म्हणणं आपल्या प्रचलित शिक्षण व्यवस्थेला तंतोतंत लागु पडतं. मूल्यांची जोपासना, रूजवणूक हया गो टी विषयीची अंत:करणापासूनची तळमळ आजच्या शिक्षणव्यवस्थेत फारशी दिसत नाही. गुणवान शिक्षकांचीही वाणवा या शिक्षण क्षेत्रात दिसते आहे. अपवादात्मक, मुठभर शिक्षक गुणवान असतातही पण एवढयाने या विशाल, अथांग अशा ज्ञानक्षेत्राला न्याय मिळणे अशक्यच वाटते. विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजातून जे ज्ञान दिले जाते ते माहितीरूपी असू नये. खऱ्या अर्थाने ते ज्ञान असावे या ज्ञानाने संस्काराचे रूप घ्यावे. ज्ञान आणि संस्कार याचा सुंदर मिलाफ व्हायला हवा. रूक्ष भावहीन, प्रेमहीन, आत्मियतेशिवाय, हृदय ओतल्या शिवाय दिले जाणारे ज्ञान, शिक्षण विद्यार्थी घडवू शकत नाही. चार दोन विद्यार्थी घडले म्हणजे शिक्षण यशस्वी झाले असे म्हणताच येणार नाही. प्रेमाने विचार स्थिर होतात. हे एक दोन दिवसाचे काम नाही. दीर्घकाळ, वर्षानुवर्षे चालणारी ही प्रक्रिया आहे. आजचा विद्यार्थी हा देशाचा भावी आधारस्तंभ असतो हे सर्वांना मान्यच आहे. हेच विद्यार्थी भावी काळात प्रत्येक क्षेत्रात विखूरले जातात. या सर्वांचा मिळून आपला समाज बनतो. देशाचं चालतं बोलतं वैभव ज्याला मानलं जातं तो समाज जर घडलेला नसेल तर, त्याची वृत्ती मलिन होणार नाही यासाठी काही प्रयत्न नसतील तर काय घडेल ? ध्येयशून्य समाज, आत्मकेंद्री समाज, स्वार्थलोलुप समाज आणि स्वातंत्र्याचं रूपांतर स्वैराचारात करणारा समाज पाहायला मिळेल. आज अशा समाजाचंच साम्राज्य सर्वत्र पसरलेलं आहे, अशा या समाजाला घडवू

न शकल्याची जबाबदारी आजच्या शिक्षणव्यवस्थेनं, शिक्षण तज्ज्ञांनी स्वीकारायला नको काय ? वेगवेगळी कारणं सांगुण जबाबदारी का झटकली जातेय ?

बिघडलेल्या काळात 'काही होता नाही आले तर मास्तर हो' असं म्हंटलं जायचं. इंग्रजांच्या काळातच अशा वृत्तीला सुरूवात झाली. आज तर चरितार्थाचं साधन म्हणून शिक्षकी पेशाकड पाहिलं जातं. भाकरी मिळविण्यासाठी, पोटभरण्यासाठी जर हा पेशा स्वीकारला जात असेल तर यात ज्ञानाची जिज्ञासू वृत्ती कशी येईल ? ध्येयवादी, तेजस्वी वृत्ती कशी दिसेल ? शिकवणं म्हणजे पाटया टाकणं नव्हे, हे शिक्षकाला कोण सांगणार ? वेळापत्रकातील तास हे अध्यापन करण्याचे तास आहेत, लिहून देण्याचे नव्हेत हे कोण सांगणार ? या बाबतीतला कळस म्हणजे महाविद्यालयात सुध्दा हेच घडताना दिसत आहे. शिकवण्यासाठी, अध्यापनासाठी दिलेल्या वेळेतील पंचाहत्तर टक्के वेळ हा लिहून देण्यात घालवला जातो. या वि यी शिक्षकांनी आत्मपरीक्षण करायला हवं. पोट भरण्यासाठी इतर खूप कामं करता येतील. ज्ञानक्षेत्राला, शिक्षण क्षेत्राला आणि शिक्षकी पेशाला पोट भरण्याचं साधन समजणं, बनविणं याच्यासारखा देशद्रोह नाही. ज्ञान मिळविण्यासाठी आणि ज्ञान विद्यार्थ्यांत रूजवण्यासाठी तिळ – तिळ आतडं तुटलं पाहिजे. पोटतिडकीनं या पवित्र पेशाला न्याय दिला पाहिजे. एकेका गुणासाठी, एकेका तत्त्वासाठी संपूर्ण आयु य पणाला लावणाऱ्याचा आपला भारत देश. असा गौरवपूर्ण इतिहास आपल्या भारताला लाभला. याचं थोडयाफार प्रमाणात का होईना चिंतन झालं पाहिजे.

विद्यार्थ्यांना बारा – बारा वर्षे 'प्रतिज्ञा' घ्यावयास लावली जाते. ही कृती आता यांत्रीक स्वरूपाची झाली आहे. 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे.....' अशी प्रतिज्ञा घोकली जाते. परिणाम मात्र शुन्य. अहो, जिथे एका उदरातून जन्मलेले भाऊ सुध्दा भावा – भावासारखे प्रेमाणे राहत नाहीत तिथे म्हणजेच अशा काळात ही प्रतिज्ञा विद्यार्थ्यांना आचरणात आनायला लावण्यासाठी शिक्षकांना जीवाचे रान करावे लागेल. दहा – पंधरा वर्षे एकत्र शिक्षण घेणारे विद्यार्थी बंधुभावाने राहतात का ? खरे मित्र बनतात का ? लग्नं होताच बापाची स्थावर मालमत्ता वाटून घेण्यासाठी कुठल्याही टोकाला जाणारे तरूण याच शिक्षण व्यवस्थेतून जातात. 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' असे बारा – बारा वर्षे दिलेल्या शिक्षणाचा कुठाय परिणाम ?

'......... माझ्या देशावर माझे प्रेम आहे..... ? असं म्हणणारा आपला विद्यार्थी शिक्षण घेतो, शासनाने याला शिक्षण देण्यासाठी लाखो रूपये खर्चलेले असतात, इथल्या बॅकेतून शैक्षणिक कर्ज देऊन आर्थिक मदतही केली जाते, इंजिनिअरींग, मेडिकल इ. अनेक क्षेत्राचं ज्ञान मिळवितो, शिक्षण घेतो आणि चार दिडक्या जास्त मिळतात म्हणून परदेशात नोकरी करतो. नोकरी करतो नव्हे स्वत:ला विकतो. स्वत:ला गहाण टाकतो. तिथे स्वदेशाची अस्मिता, स्वदेशावरील प्रेम, स्वदेशाचा अभिमान गहाण टाकायला,, स्वदेशाच्या तरूणाची ओळख लाचार तरूण, स्वार्थलोलुप तरूण म्हणून करून द्यायला याला काहीच लाज वाटत नाही. हेच का याचं देशावरील प्रेम. सैन्यात भरती होतो भाकरी मिळावी म्हणून, देशाची सेवा करण्यासाठी नव्हे. एम.पी. एस.सी., यू.पी.एस.सी. उत्तीर्ण होऊन अधिकारी बनतो, काळा पैसा गोळा करण्यासाठी. कट्टयावरच्या गप्पांमध्ये जर विचारलं ''का बाबा तू हे क्षेत्र का निवडत आहेस ? तर हा उत्तर देतो ''अख्खा पगार शिल्लक पडतो. वरच्या कमाईतच घर चालतं. खोऱ्यानं पैसा ओढता येतो'' हाच तरूण जेव्हा मुलाखतीत, कार्यक्रमात, मनोगतात बोलतो तेव्हा सांगतो की, ''मला जनतेची शक्य तितकी सेवा करायची आहे. नोकरी करण्यासाठी नव्हे सेवा करण्यासाठी मला हे पद मिळवायचे आहे. हे माझं ध्येय आहे.'' अशा दुतोंडी रावणाचा जन्म प्रचलित शिक्षण व्यवस्थेतच होतो. हे असलं प्रेम आम्ही आमच्या तरूणात, विद्यार्थ्यांत आपल्या देशावि यी निर्माण करतो. आजच्या या शिक्षणातून आम्ही विद्यार्थी घडवत आहोत का बिघडवत आहोत ? या विषयी संभ्रमच आहे. प्रतिज्ञेतील प्रत्येक ओळ हृदयात कोरून ठेवावी अशी आहे पण परिणाम मात्र शून्य. कसं करता येईल या गोष्टींचं मूल्यमापन ?

ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणतात ''मूल्याधारित शिक्षणाची कास धरणे आणि मुलांमध्ये प्रेरणा व आकांक्षा निर्माण करणे हे शिक्षकांचे महत्कार्य आहे. आजच्या शिक्षकांनी जर हे लक्षात ठेवले तर ते नक्कीच उत्तम पिढी घडवू शकतील'' शिक्षकाला असा कानमंत्र कलाम देताना आपल्या शिक्षकाचं उदाहरणही सांगतात.'' त्रिचीच्या सेंट जोसेफ कॉलेजमध्ये शिकत असताना आम्हाला रेव्ह. फादर टी.एन. सिक्वेरा, क्सपिअर शिकवत असत. आम्हाला वाटायचे जर खुद्द शेक्सपीअर त्यांच्या लेक्चरला बसला असता तर त्यांचे ते रंगून जाऊन शिकवणे बघून सद्गदित झाला असता. याच फादर सिक्वेरा या पितृतुल्य व्यक्तीने आम्हाला जे प्रेम दिले, त्यातून आम्ही परोपकार शिकलो'' कलामांच्या या विचारातून त्यांच्या आदर्श शिक्षकाच्या उदाहरणातून शिक्षक कसा असावा हे समजते. शिक्षण कसं असावं याची सूचनाही मिळते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर त्यांच्या भावे सरांच्या विषयी सांगतात ''निसर्गाकडे पाहा य निसर्गातून शिका य असे आवाहन करीत कृतिप्रवण शिक्षणावर भावे सर भर देत. भावे सर पदरमोड करून आम्हाला शिक्षणाचा जीवनानुभव देण्यासाठी घेऊन जात. भावे

सरांनी पुस्तकाबाहेरील धडेही दिले'' माशेलकरांचे हे शिक्षक फक्त चाकोरीबध्द शिक्षणाचे धडे देणे म्हणजेच शिक्षण देणे समजत नव्हते. पुस्तकाबाहेरीलही धडे त्यांनी दिले. आणि आपल्याला थोरशास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर मिळाले.

''मूल्य शिक्षणाला फाटा दिल्यास शिक्षण ही संकल्पना पूर्ण होऊच शकत नाही. खरे तर शिक्षकांकडून मुलापर्यंत स्वाभाविकपणे मूल्ये झिरपली पाहिजेत. आमचे तर भाग्य की आम्हाला रेव्ह. फादर रेक्टर कलाथिल नावाचे खास शिक्षक होते. जे दर सोमवारी एक तास चक्क गो टी सांगायचे. गौतम बुध्द, कॅल्क्युलस, सेंट ऑगस्टिन, म. गांधी, आईन स्टाईन, अब्राहम लिंकन अशा थोरांच्या गोष्टी ते सांगत. या व्यक्तींचे मोठेपण सांगताना माणसाने मोठे व्हायचे म्हणजे नेमके कोणते गुण अंगी बाणायचे, याची व्याख्या मनात ठसून गेली'' ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या या मनोगतातून मूल्यशिक्षणाचे महत्व समजते. अशा शिक्षणाची अनिवार्यता आपल्या शिक्षणात असायला हवी. हे अब्दुल कलामांना महत्वाचे वाटते. आमच्या शिक्षण व्यवस्थेला, शिक्षकाला, प्राध्यापक म्हणवून घेणाऱ्यांना याचे महत्व केव्हा वाटणार ? आपल्या मानवतावादी संस्कृतीतील राम, कृष्ण, ऋशी, मुनी, संत महंत इ. महापुरूषादींचे चरित्र सांगणाऱ्या शिक्षकावर टीका केली जाते. अशा टीका करणाऱ्या शिक्षकांना, प्राध्यापकांना, युगपुरूष स्वामी विवेकानंद व छत्रपती शिवाजी महाराजादी चरित्रे म्हणजे विशिष्ट धर्माचे शिक्षण वाटते. ही शहाणी माणसं आणि आमच्या इतिहासातील, संस्कृतीतील आदर्श चरित्रे म्हणजे वेडी माणसं आहेत का ? मानव्याचं शिक्षण कसं द्यायचं असतं, मानव्य कसं उभं करायचं असतं याचा थांगपत्ता ज्याला नाही तो निघालाय शिक्षण द्यायला. मानव्याचं वावडं असणारा एक तरी धर्म हया पृथ्वीतलावर आहे का ? मानव्याचं निखळ तत्वज्ञान असणाऱ्या 'गीता' ग्रंथाचे पाठ देश – विदेशात घेतले जातात आणि आम्ही मात्र त्याला कालबाहय ठरवतो. हीच का आमच्या बुध्दीची समज ? हीच का आमच्या शिक्षणाची खोली, व्याप्ती ?

स्वामी विवेकानंद म्हणत असत ''Give me hundred Nachiketas and I shall change the world'' का भावलं होतं नचिकेत्याचं चरित्र विवेकानंदांना ? प्रलोभनाला बळी न पडणारा हा बालक कोणत्या शिक्षणानं घडला ? याचा विचार आपल्या शिक्षण व्यवस्थेनं करायला नको का ? ज्या शिक्षणात असे नचिकेता घडविले जात होते ती शिक्षणपध्दती काळानुरूप आजही आपण आपल्या आजच्या शिक्षणात आणू शकत नाही का ? आजची बुध्दी त्या शिक्षणाला आजचं आधुनिक रूप देऊन सुवर्ण मध्य गाठू शकत नाही का ? का बरं आजही पूर्वग्रहदू ीत वृत्तीने 'जी भारताची ाान आहे' अशा तपोवनपध्दतीकडे पाहिले जाते. काळाच्या ओघात काही कचरा घुसल्यास तो काढणं आपली जबाबदारी नाही का ? गंगेचं रूप आज मलिन दिसतं आहे म्हणून उगमाच्या ठिकाणची गंगाही मलिनच समजणे म्हणजे मूर्खपणा नाही का ? या सर्व गो टींवर शिक्षण तज्ज्ञ म्हणवून घेणाऱ्यांनी व शिक्षक म्हणवून घेणाऱ्यांनी विचार मंथन करणं भाग आहे. चिंतन – मनन करून निर्मळ वृत्तीनं आपला विद्यार्थी घडवणं ही काळाची गरज बनली आहे.

कोणी म्हणेल आजच्या शिक्षणातही मूल्यांचा विचार केलेला आहेच की. आज आम्ही 'राष्ट्रीय सेवा योजना' महाविद्यालयात राबवतो आहे. या सेवा योजनेत दहा गुणाचं अमीश, प्रलोभन दाखवून प्रवेश दिला जातो आणि विद्यार्थीही या दहा गुणांसाठीच या योजनेत सहभागी होतो. सेवावृत्तीने होताना दिसत नाही. बाहेर पडल्यावर हे शिक्षण डोक्यात, आचरणात न राहता महाविद्यालयातल्या कागदावरच राहते. याचा काहीच परिणाम होत नाही असंही मला म्हणायचं नाही. काही अंशी याचा चांगला उपयोग होतोही नाही असे नाही. मूल्यशिक्षण देतेवेळी देणारा शिक्षक चारित्र्यवान असणं अत्यंत महत्वाचं. शिक्षकाची नैतिक उंची असलीच पाहिजे. आजचा शिक्षक या गो टीला फारसं महत्व देत नाही. विद्यार्थ्यांबरोबरच मद्यपान करून पाटर्या झोडणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. खाजगी चर्चेत विद्यार्थीनींविषयी अश्लील बोलणाऱ्यांचीही संख्या कमी नाही. 'शाळेतल्या, महाविद्यालयातल्या वेळेखेरीज आम्ही बाहेर काय करतोय हे कोणी आम्हाला विचारू नये, तो आमच्या इच्छेचा प्रश्न आहे' असे म्हणणारे गुरू (?) काही कमी नाहीत. शिवाजी विद्यापीठाच्या आवारातच मद्यपानात धुंद झालेले लोक, शिक्षण क्षेत्रातील महत्वाचे घटक असलेले लोक हे कशाचं द्योतक आहे ? का ही बजबजपुरी आमच्या पवित्र ज्ञानक्षेत्रात माजली आहे. शिक्षणक्षेत्राला आज धंद्याचं रूप आलंय बाजारपेठेचं रूप आलंय. हे थांबायला हवं. संकुचित वृत्ती टाकायला हवी. झोकून देवून काम करायला हवं. हे क्षेत्र पारदर्शक हवं.

'मूल्यांवर आधारीतच शिक्षणव्यवस्था हवी' असे पू. रामदेवजी बाबा म्हणतात ''कितीही बुध्दीमान व प्रसिध्द व्यक्ती चारित्र्यवान नसेल तर ती आमचा आदर्श होऊच शकत नाही. ती आदर्श झाली नाही पाहिजे'. असे साऱ्या देशाला सांगत असलेले रामदेव बाबा यातून शिक्षणाचं गुपितच सांगून जातात. जीमूल्ये आपण रूजवणार आहोत ती मूल्ये ज्यांच्या जीवनात होती, ज्या जीवनात आहेत अशी चरित्रं सांगणं हे अत्यंत महत्वाचं असतं. तोंडाला पाणी सुटेल अशी, मोह वाटेल अशी,' अस्सं जीवन असलं पाहिजे' असे वाटायला लावणारी चरित्रं खूप काही देऊन जातात. माणूस घडतो तो या पध्दतीतून ही चरित्रं अशी असावीत की, 'मन' या चरित्रांसमोर नतमस्तक झालं पाहिजे. हे झालं चरित्रांचं, शिक्षक तर चालते बोलते सद्गुणांचे

भांडार असावेत. किमान असं बनण्याचा प्रयत्न जीवापाड करणारे असावेत. असं घडू लागलं तर निश्चितच आपल्याला आदर्श विद्यार्थी घडवता येतील.

शिक्षणव्यवस्थेनं अनेक पध्दतीनं परिणामकारक शिक्षण द्यावं. अशा प्रकारचे आजच्या काळातील आदर्श विद्यापीठ जर पाहायचे असेल तर 'तत्वज्ञान विद्यापीठ, ठाणे' येथे जावे लागेल. तपोवन आणि आधुनिक पध्दतीचा सुवर्णमध्य आपल्याला पाहायला मिळेल. 'रेमन मॅगासिसे पुरस्कार', 'टेम्पल्टन पुरस्कार' अशा अनेक पुरस्कारानी सन्मानित झालेल्या पू. पांडुरंगशास्त्री आठवले (दादा) यांच्या प्रेरणेने हे विद्यापीठ सुरू झाले. 'मानव्याचा ज्वलंत पाठ देणारे विद्यापीठ' अशी या विद्यापीठाची ओळख आहे. आपल्या बरोबरचा प्रोटोकॉल नाकारून तत्कालीन उपरा ट्रपती राधाकृ णन यांनी विद्यापीठात जाऊन पांडुरंगशास्त्रींची भेट घेतली होती. तिथल्या भोजनाची तपासनी न करता भोजनाचाा आस्वाद घेण्याची व स्वत:चा प्रोटोकॉल विद्यापीठाच्या बाहेरच ठेवण्याची पांडुरंगशास्त्रींची अट राधाकृ णननी मान्य केली होती. व त्याप्रमाणे आचरणही केले होते. शिक्षकांचा आदर्श असलेले राधाकृष्णन, शिक्षण तज्ज्ञ असलेले राधाकृष्णन, तत्वज्ञानी असलेले राधाकृष्णन ठाण्यातील तत्वज्ञान विद्यापीठाची शिक्षणप्रणाली पाहून अत्यंत नम्र व प्रभावित झाले होते. अनेक जागतीक तत्वज्ञांनी, बुध्दीमंतांनी भारतीय संस्कृतीतून उदयाला आलेल्या तत्वज्ञान विद्यापीठाची, 'स्वाध्याय कार्याची' म्हणजेच 'मानव्य निर्माण करण्याच्या आदर्श पध्दतीची' बुध्दीपूर्वक, हृदयपूर्वक तारीफ केली होती. यातून काहीतरी या आपल्या शिक्षण व्यवस्थेनं शिकायला हवंच.

प्राचीन काळी शिक्षण विनामूल्य मिळायचं. समाज स्वत: आपणहून शिक्षण व्यवस्थेला मदत करायचा (Voluntary Taxation). तपोवनात राजसत्ता चालत नसे. राजा आणि शिक्षणसंस्था चालक यांच्यात प्रेमळ संबंध होते. ब्रह्मचर्य व्रताचे पालन अनिवार्य होते. 'ब्रह्मचर्यामुळे इन्द्रियांची सर्व शक्ती बुध्दीलाच मिळत असे आणि त्यामुळे ते तैलबुध्दीचे होत सूर्याचे पसरलेले किरण वस्तूला जाळू शकत नाहीत तर काचेमध्ये केंद्रीत झालेले किरणच वस्तू जाळू शकतात. अशा तऱ्हेने इन्द्रियांची सर्व शक्ती बुध्दीला दिल्यामुळे कोणतीही गोष्ट अर्धवट राहात नसे. विखुरलेली, फुकट गेलेली जर शक्ति असेल तर मेंदूला ती कमीच मिळणार, म्हणून ब्रह्मचर्याची अत्यंत जरूरी आहे' असे प्राचीन शिक्षण पध्दती मानते. आधुनिक परिभाषेत तपोवन म्हणजे Residential Education System.' गुरूशि यांचे संबंध अलौकिक होते. स्त्रीयांना दिले जाणारे शिक्षण स्त्रीत्वाचा विकास करणारे होते. Manly woman & Womanly man' होतील असे आजच्यासारखे नव्हते. भूमिति, त्रिकोण मिती शिकवून कुठे मानव्य निर्माण करता येतं का ? तर येत नाही. लहानपणी संस्कारांकरीता शालीन कुटुंबे, नंतरच्या अभ्यासासाठी तपोवने आणि शेवटी संपूर्ण जीवन अभ्यासी जीवन घालविण्यासाठी स्वाध्यायमंदिरे चालविली जात असत. अशी अनेक गुपितं, अनेक वैशिष्टये प्राचीन काळच्या शिक्षण व्यवस्थेची होती. एवढे मात्र नक्की की, आपण चारित्र्यवान आणि नीतिमान झाल्याशिवाय आदर्श विद्यार्थी, आदर्श समाज आणि मानव्याची उच्च स्थिती गाठू शकत नाही. मुठभर विद्यार्थी घडले म्हणजे देश घडला असं होत नाही. आजची शिक्षण समस्या ही हिमालयाएवढी मोठी बनली आहे. आजच्या शिक्षण तज्ज्ञांना हे आव्हान आहे. हे आव्हान पेलण्याची ाक्ती आजच्या शिक्षकांना आणि शिक्षण तज्ज्ञांना मिळो आणि मानव्याचा सुगंध सर्वत्र येवो.

**सदंर्भ –**

१. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम – दै. लोकसत्ता,चतुरंग, ५ सप्टेबंर २००९
२. डॉ.रघूनाथ माशेलकर – दै.लोकसत्ता,चतुरंग ५ सप्टेबंर २००९
३. पाडूरंग शास्त्री आठवले – 'संस्कृति चिंतन'
४. पांडूरंग ाास्त्री आठवले – 'वाल्मीकी रामायण'